**इंदिरा आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणा-या घरकुलाच्या कामातील अकुशल कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-मग्रारो-२०१४/प्र.क्र.६४ अ/ रोहयो-१०अ**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२,**
**दिनांकः-३० मे, २०१५.**

**वाचाः-** १) केंद्रिय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या जून, २०१४ च्या मार्गदर्शक सूचना.

**प्रस्तावना :**

इंदिरा आवास योजनेंतर्गत लाभधारकास प्रत्यक्ष घरकुलाचे बांधकाम करतांना उपजिविकेसाठी आवश्यक असूनही मजूरी पासून वंचित रहावे लागते. इंदिरा आवास योजनेचा लाभार्थी घरकुलाचे बांधकाम करताना उपजिविकेचे साधन असलेल्या मजूरीपासुन वंचित राहू नये हा प्रमुख दृष्टिकोन समोर ठेवून इंदिरा आवास योजनेच्या बांधकामाचा अकुशल भाग महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये अभिसरण अंतर्गत घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

दिनांक ३ जानेवारी, २०१४ च्या राजपत्रात याबाबत अधिसूचना प्रसिध्द करून केंद्रिय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूचि-१ परि. ४ (१)२(४) मध्ये सुधारणा केली आहे. सदर सुधारणेप्रमाणे इंदिरा आवास योजनेंतर्गत तसेच या योजने सारख्या राज्य व केंद्र शासनाच्या इतर योजनेंतर्गत बांधण्यात येणा-या घरांच्या कामामधील अकुशल स्वरूपाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेणेबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. सदर बदल केल्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत टिकावु मत्ता निर्मिती समवेत ग्रामीण भागातील गरीबांचे जीवनमान सुधारण्यास देखील योजनेचा हातभार लागणार आहे. यास्तव सदर योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात राबविणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

इंदिरा आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणा-या घरांच्या कामामधील अकुशल स्वरूपाची कामे उदा. घरकुलाच्या जोत्यापर्यंतचे बांधकाम, जोत्यापासुन ते सज्जापर्यंतचे बांधकाम, सज्जापासुन ते छतापर्यंतचे बांधकाम तसेच छताची बांधकामे व घरकुलाची संपुर्ण कामे पुर्ण होईपर्यंत इत्यादी अकुशल कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग़ामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यास शासन मान्यता देत आहे. यामुळे या कार्यक्रमांतर्गत टिकावू मालमत्ता निर्माण होवून तसेच चांगल्या दर्जाची घरे मिळाल्याने ग्रामीण भागातील गरीबांचे जीवनमान उंचविण्यास मदत होईल.

**योजनेचे स्वरूपः-**

इंदिरा आवास योजना तसेच या योजने सारख्या राज्य व केंद्र शासनाच्या इतर योजना उदा. रमाई आवास योजना, राजीव गांधी निवारा क्र.२ इ. योजना समवेत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अभिसरण करण्यात आलेले आहे. यामध्ये इंदिरा आवास योजनेंतर्गत नव्याने मंजुर कामासाठी

आर्थिक वर्ष २०१५-१६ चे उद्दिष्ट अकुशल स्वरूपाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करता येतील. अशी कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या वैयक्तिक लाभ योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच इंदिरा आवास योजनेच्या निकषाप्रमाणे करणे बंधनकारक आहे.

**संकल्प चित्र व आराखडे (Designs/ Specifications) :**

१) सदर कामांसाठी आखणी, संकल्प चित्रे व आराखडे हे घरकुलाच्या (इंदिरा आवास व तत्सम योजना) योजनेच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे निश्चित केलेले वापरणे बंधनकारक राहील.

२) योजने अंतर्गत बांधण्यात आलेले घर पक्के व टिकावु असावे. घरे बांधताना क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध साहित्याचा वापर करणे, इको फ्रेंडली असणे तसेच मजूर क्षमतेचा परिपुर्ण वापर केला जाईल या बाबी विचारात घ्याव्यात.

**कामाच्या अंमलबजावणीसाठीचे महत्वाचे निकष:**

१) लाभार्थींची निवड इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे करणे आवश्यक आहे.

२) सदर योजनेसाठी प्रस्तावित इंदिरा आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थी यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जॉबकार्डधारक असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांकडे जॉब कार्ड नसल्यास, ग्रामपंचायतीकडे विहित नमुन्यात अर्ज केल्यास, प्रचलित नियमानुसार तपासणी करून, पात्र कुटुंबांना जॉब कार्डचे वाटप ग्रामपंचायतीने ७ दिवसात करणे बंधनकारक राहील. लाभार्थी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परि. ५ च्या अनुसूची १ मध्ये विहित केलेल्या खालील संवर्गापैकी ( category) असावा.

- अनुसूचित जाती (SC)
- अनुसूचित जनजाती (ST)
- दारिद्रय रेषेखालील लाभार्थी (BPL)
- अल्प व अत्यल्प भुधारक
- वन हक्क कायद्याखाली जमिनीची पट्टी मिळालेले लाभार्थी
- भटक्या /विमुक्त जाती
- महिला कुटुंब प्रमुख असलेले कुटुंब
- अपंग व्यक्ती कुटुंब प्रमुख असलेले कुटुंब

३) साधारणत: सदर योजनेसाठी लाभार्थ्याने मजूर म्हणून स्वत: काम करणे आवश्यक असून फक्त ६० वर्षाहून अधिक वय असलेले व शारीरीक दृष्ट्या अपंग व्यक्ती यांना काम करण्यापासुन सूट राहील.

४) सदर कामावर मजूरीची अदायगी बँक / पोस्ट खात्यातुन करणे बंधनकारक आहे. मजूरांना स्वतंत्र खाते उघडण्याची आवश्यकता नसुन अस्तित्वात असलेल्या कोणत्याही खात्यात मजूरीची रक्कम जमा करता येईल. मात्र, मजूरांकडे कोणतेही खाते नसल्यास, खाते उघडावे लागेल.

**नियोजन आणि अंमलबजावणीची प्रक्रिया :**

१) इंदिरा आवास योजनांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेकडुन प्राप्त झाल्यावर इंदिरा आवासच्या नरेगा अंतर्गत प्रस्तावित अकुशल

कामासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही गट विकास अधिकारी यांचे स्तरावरून करण्यात यावी. जी कामे शेल्फमध्ये व कृती आराखड्यात समाविष्ट नाहीत अश्या कामांना गट विकास अधिकारी स्तरावरून प्रशासकीय मान्यता दिल्यावर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून आवश्यक असल्यास कार्योत्तर मंजूरी प्राप्त करून घ्यावी.

२) एका ग्रामपंचायती अंतर्गत प्रस्तावित सर्व कामांना एकत्रित प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल.

३) एक घरकुल हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत एक काम असे समजुन प्रत्येक घरकुलासाठी स्वतंत्र वर्क कोड तयार करावे.

४) सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत इतर कामांसमवेत इंदिरा आवास योजना व मगांराग्रारोहयो अभिसरण अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचा देखील समावेश असेल.

५) लाभार्थ्याने काम सुरू करण्याची तयारी दर्शविल्यावर किंवा कामाची मागणी केल्यावर ग्रामरोजगार सेवक पंचायत समिती स्तरावर कामाची मागणी नोंदवेल व ई-मस्टर प्राप्त करून सदर कामावर वापरेल. ई-मस्टर प्राप्त करून घेण्यासाठी खालीलप्रमाणे कामाचे चार टप्पे निश्चित करून देण्यात आले आहे.

अ) जोत्यापर्यंतचे बांधकाम.
ब) जोत्यापासुन ते सज्जापर्यंतचे बांधकाम.
क) सज्जापासुन ते छतापर्यंतचे बांधकाम.
ड) छताचे बांधकाम व घरकुलाचे संपुर्ण कामे पुर्ण होईपर्यंत

कामाची मागणी घेताना लाभार्थ्याचे आधार क्रमांक अनिवार्य नाही. याबाबत क्षेत्रिय कर्मचा-यांना स्पष्ट सूचना द्याव्यात. ज्या लाभार्थ्यांचा आधार क्रमांक नसेल त्यांचे बाबतीत सूट मिळविण्याची कार्यपध्दती आयुक्त, नरेगा नागपूर यांच्या पत्र क्र. आयुक्तालय/ आस्था/७१०/२०१५, दिनांक १५/०४/२०१५ अन्वये देण्यात आली आहे. आधार क्रमांक नसल्यामुळे कोणीही कामापासुन वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी.

६) मगांराग्रारोहयो अंतर्गत असलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे ई-मस्टर प्राप्त करणे, ई-मस्टर पेमेंट साठी पंचायत समितीस सादर करणे ही कामे ग्रामरोजगार सेवकामार्फत करण्यात यावी. मजूरीचे भुगतान EFMS प्रणाली मार्फत करण्यात यावे.

७) हजेरीपत्रक संपल्यावर इंदिरा आवास योजनेचे मोजमाप नोंदविणारे अभियंते त्यांचे नियमित कार्यपध्दतीप्रमाणे मोजमाप नोंदविण्याची प्रक्रिया पुर्ण करतील व हजेरीपत्रकावर नोंदविलेल्या उपस्थिती व झालेल्या कामाप्रमाणे मजूरी अदा करण्याची शिफारस करतील. मोजमाप प्रक्रिया सुलभ करण्यासाठी १ किंवा २ पानाच्या pre-printed मोजमाप पुस्तिकेचा वापर करता येईल. मजूरीची अदायगी मगांराग्रारोहयोच्या नियमित कार्यपध्दती प्रमाणे करण्यात येईल.

**खर्च करण्याची कार्यपध्दती:**

१) इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे किमान २० चौरस मीटरच्या घरांचे बांधकाम करताना ९० दिवस अकुशल मनुष्यदिवस अनुज्ञेय आहे. त्यानुसार विहित केलेल्या मर्यादेपर्यंतच म्हणजेच ९० मनुष्यदिवस मजूरीची रक्कम मगांराग्रारोहयोच्या दराने ४ हजेरीपत्रके भरून अदा करणे आवश्यक आहे. डोंगराळ भाग व आयएपी जिल्ह्यांमध्ये ९० दिवसां ऐवजी ९५ दिवस अनुज्ञेय राहील. मुद्दा क्रमांक ५ मध्ये नमुद प्रत्येक टप्प्यासाठी अपेक्षित मनुष्यदिवसा प्रमाणे हजेरीपत्रक भरून मजूरीची अदायगी मगांराग्रारोहयोच्या कार्यपध्दतीप्रमाणे करावी.

२) इंदिरा आवास योजनेच्या नमूना अंदाजपत्रकाप्रमाणे अंदाजित २० स्क्वे. मीटरचे बांधकाम गृहित धरून टप्पानिहाय अपेक्षित अकुशल निर्मित मनुष्य दिवस पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क | बांधकामाचे टप्पे | मनुष्य दिवस (९० दिवस अकुशल मनुष्य दिवसाप्रमाणे) सर्वसाधारण भागात | मनुष्य दिवस (९५ दिवस अकुशल मनुष्य दिवसाप्रमाणे) डोंगराळ क्षेत्रात आणि आयएपी जिल्ह्यात |
|---|---|---|---|
| १. | जोत्यापर्यंतचे बांधकाम. | २८ | ३० |
| २. | जोत्यापासुन ते सज्जापर्यंतचे बांधकाम. | २४ | २५ |
| ३. | सज्जापासुन ते छतापर्यंतचे बांधकाम. | १० | १० |
| ४. | छताचे बांधकाम व घरकुलाचे संपुर्ण कामे पुर्ण होईपर्यंत. | २८ | ३० |
| | घरकुल पुर्ण करण्यासाठी मनरेगा अंतर्गत प्रस्तावित एकूण अकुशल मनुष्यदिवस. | ९० | ९५ |

घरकुलाचे उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित कामे पुर्ण करताना घरकुल बांधकामा दरम्यान वैयक्तिक शौचालयाची कामे पुर्ण करणे अनिवार्य राहील. यावेळी आवश्यक त्या ठिकाणी स्वच्छ भारत मिशन चमूचा सहभाग घेवुन शौचालय बांधकाम करणे अनिवार्य राहील.

**सनियंत्रण व अहवाल सादरीकरण :**

१) मगांराग्रारोहयो अंतर्गत व इंदिरा आवास अभिसरण अंतर्गत घरकुलाचे बांधकामाच्या कामाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत/ नरेगा) यांची संयुक्तरित्या राहील.

२) घरांच्या बांधकामाच्या प्रगतीबाबत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि निर्मल भारत अभियान अभिसरणाद्वारे बांधण्यात आलेल्या घरकुलाची प्रगती ही जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि इंदिरा आवास योजना/ इतर घरकुल योजनेच्या कार्यान्वय यंत्रणांची जबाबदारी असेल.

३) कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या घरांचे सामाजिक अंकेक्षण २०११ च्या लेखा परिक्षा अंतर्गत घेण्यात येईल.

४) या कार्यक्रमांतर्गत बांधून पूर्ण झालेल्या घराच्या तपशिलाची नोंद आणि त्यावर झालेला खर्च इ. सविस्तर माहिती मनरेगा software अंतर्गत ठेवण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक ------------------ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रभाकर देशमुख)
सचिव (रोहयो)

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव (ग्राम विकास)

प्रत:-

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४००३२,
मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२,
प्रधान सचिव (ग्राम विकास) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधानसचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
आयुक्त, नरेगा, नागपूर,
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
उपसचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी ( बृहन्मुंबई वगळुन),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) जिल्हा परिषद,
विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे, पुणे,कोल्हापुर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, लातुर,
सर्व अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/ पुणे/कोकण वृत्त ठाणे,